REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# '१९६० नंतरच्या मराठी कथासाहित्यातील आंबेडकरवादी दृष्टीकोन'

**प्रा. डॉ. रूपेश नरहरी कऱ्हाडे**
**पदवी व पदव्युत्तर मराठी विभाप्रमुख, बा.बु. कला, ना. भ. वाणिज्य व बा. पा. विज्ञान महावद्यालय, दिग्रस, जि. यवतमाळ.**

## प्रस्तावना :



"साठोत्तरी मराठी कथेतील आंबेडकरवाद" या विषयाच्या संदर्भाने सर्वप्रथम कथा म्हणजे काय? विचार आपणासमोर मांडतो. कथा हा एक स्वतंत्र वाङ्मय प्रकार आहे. कथा, कहाणी आणि गोष्ट पुरातन काळापासूनच मानवी जीवनप्रवाहाबरोबर प्रवाहित होत आली आहे. मानवी जीवनाच्या आरंभापासूनच मानव जस-जसा आपला स्वतःचा विकास करीत होता. तस-तसा विविध कथांचा जन्म होत होता. दंतकथा, लोककथा, अद्भूतरम्यकथा, परिकथा, गौरीच्या गोष्टी, दैवतकथा, बोधकथा हे सर्व कथाप्रकार बाल-वृद्धांपर्यंत मानवाच्या जीवनप्रवाहाबरोबरच वावरत आलेले दिसून येतात. मानवाचे मन श्रद्धेने, परंपरेने, धार्मिक-सामाजिक रुढीने, चालीरीतीने, राजकीय व्यवस्थने आणि सनातन मानवी भाववृत्तीमुळे मानवी जीवनातील अंगोपांगातील अनुभवांच्या कल्पना विश्वातून कथेचा प्रवाह मौखिक, लिखित स्वरुपात अव्याहतपणे चालत आलेला दिसतो, कथानिवेदन आणि कथाश्रवण ही एक मानवी गरजच असावी असे आपणास जाणवते. अशा गरजेतून पिढ्यांनुपिढ्या समाजातील सर्वच स्तरातून तिचा वापर झालेला दिसून येतो. आपले सुख-दुःख दुसऱ्याला सांगणे, कडू-गोड जीवनानुभव प्रकटणे यातूनच "कथा" निर्माण झाली. या संदर्भात **प्रा.ना.सी.फडके** म्हणतात -

"विश्व म्हणजे एक अनाद्यनंत अखंड प्रवाह असून मानवी जीवन म्हणजेच एक कथा आहे. किंबहूना असंख्य दीर्घकथांची ती एक मालिका आहे, अशी मालिका की, ती केव्हा कुठं सुरु झाली याचा पत्ता नाही व केव्हा-कशी संपणार याचा अद्मास नाही."

## कथेच्या व्याख्या

कथा म्हणजे कालानुक्रमे जोडलेल्या घटनांची व्यवस्थित बांधणी होय. किंवा कार्यकरण संबंधाने जोडलेल्या घटनांच्या व पात्रांच्या सहाय्याने बांधलेली हकीकत होय.

### १) हडसनची व्याख्या

"लघुकथेत केवळ एकच-एक मूळ कल्पना असते किंवा तार्किक निष्कर्षासह उद्दीष्टपूर्तीच्या अनुरोधाने त्या मूळ कल्पनेचा विकास अगदी सहज स्वाभाविक रितीने झालेला दिसतो."

### २) सर व्ह्यू पोलची व्याख्या

"लघुकथेत निरनिराळ्या घटना-प्रसंगाची मांडणी अशाप्रकारे चित्रित व्हावी की, त्यातून सक्रिय आशावादी विकास दृग्गोचर व्हावा आणि आपली जिज्ञासावृत्ती व कुतूहल सतत जागे ठेऊन कथेने उत्कटतेचा उत्कर्षबिंदू गाठावा, परिणामी त्यातून वाचकांचे पूर्ण समाधान व्हावे."

### ३) चंद्रगुप्त विद्यालंकार यांची व्याख्या

"घटनात्मक इकहरे चित्रणका नाम कहाणी है | और साहित्यके सभी अंगोके समान रस इसका गुण है |

**४) जॅक लंडनची व्याख्या** (अमेरिकन कथाकार)

"Concrete, to the point with snap and go and life, crisp cracking and interesting."

अशा या कथांच्या काही व्याख्यानंतर कथातंत्राचा किंवा कथा बांधणीचा विचार करतांना प्रामुख्याने (१) कथावस्तू (२) पात्र (३) व्यक्तिचित्रण-स्वभावदर्शन (४) संवाद (५) वातावरण (६) भाषाशैली इत्यादी. यांची मांडणी करुन कथा साकार केल्या जाते.

मराठी कथेचा प्रारंभ एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर झाला. "शेतकऱ्यांचा आसूड" मधून जोतीरावांनी प्रथमच उपेक्षितांच्या यातना मांडल्या. शोषण करणारे आणि शोषित यांचे दर्शन आपणास शेतकऱ्याचा आसूड मधून घडते. शेतकऱ्याचा आसूड हे तसे वास्तवशील आणि वैचारिक लेखन आहे परंतु हे लेखन करतांना म.फुले हे शोषक आणि शोषित यातील संबंधाने चित्रण अत्यंत उत्कटपणे रेखाटतात आणि त्यामुळे या लेखनाला श्रेष्ठ दर्जाचे कथामूल्य प्राप्त होते, असे आपणास म्हणता येईल.

यापूर्वी मराठी कथा उत्तान श्रृंगारात, उद्‌भुतात आणि मनोरंजनात छानपणे रमली होती. कौटुंबिक कथा असे स्वरुप या कथेला मोठ्या प्रमाणात आले होते. उच्चवर्णीय आणि मध्यमवर्गीय कुटुंबातील पारंपारिक भावविश्वाचे पोषण करण्याचे कार्य ही पारंपारिक कथा करीत होती. लोककथा, कहाणी, स्फुट गोष्ट, संपूर्ण गोष्ट, लघुकथा अशा स्थित्यंतरामधून मराठी कथेची वाटचाल झालेली आहे. हरिभाऊ आपटे यांनी मराठी कथेला वास्तवात आणले. घटनाप्रधानतेकडून मनःप्रधानतेकडे ही कथा हरिभाऊपासूनच वळू लागली होती. "काल तर मोठा कठीण आला" या कथेमधून हरिभाऊंनी मराठी कथेला एक व्यापक दिशा दिली. सानेगुरुजी, श्री म.माटे, वि.स.खांडेकर इ. लेखक गांधीवादी दृष्टीने लेखन करीत होते. उपेक्षितांच्या-विषयीची सहानुभूती दया आणि अनुकंपा असे स्वरुप या लेखकांच्या कथेला प्राप्त झाल्याचा प्रत्यय येतो.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या प्रेरणेने अनेक लेखक लिहू लागले त्यात "जनता" आणि "प्रबुद्ध भारत" या नियतकालिकांमधून लेखन करणाऱ्या "निर्गुणा कांबळे" यांचा गौरवाने उल्लेख करणे अपरिहार्य आहे. सनातनी समाजाची मानसिकता आणि नवजागृत बहिष्कृत यातील ताण व्यक्त करणारी सकस कथा निर्गुणाबाईंनी लिहिली. १९५३ पासून लेखन करणाऱ्या बंधुमाधवांचे "आम्हीही माणसं आहोत" आणि "पेटलेले आकाश" हे दोन कथासंग्रह प्रकाशित झाले. आपल्या लेखनीतून, शब्दाशब्दातून, क्रांतीच्या ठिणग्या उडाल्या पाहिजेत अशी बंधुमाधवांची भूमिका आहे. डॉ.आंबेडकरांचे विचार घरोघरी पोहचविण्याचे कार्य बंधुमाधवांच्या कथेने अत्यंत निष्ठापूर्वक केले. त्यांच्या "वतनी कथा" म्हणजे नवजागृत समाजमनाचा सशक्त हुंकारच होय. मुलांना शिकवा, अन्यायाविरुद्ध बंड करा, मेलेली गुरे ओढू नका अशा मांडणीतून ही कथा संघर्षाचे चित्रण करते. "Black like me" या अमेरिकेतील पुस्तकावरुन त्यांना "जावे त्यांच्या वंशा" ही कथा सुचली. गोऱ्या माणसाने काळे होऊन निग्रोंच्या दुःखांचा अनुभव घेतल्याचे चित्रण येथे बंधुमाधवाने केले आहे.

आंबेडकरवादी साहित्यात "कथा" या वाङ्‌मय प्रकारात अत्यंत कलासंपन्न लेखन झालेले आहे. अनेक आंबेडकरवादी कथाकारांनी मराठी कथेच्या इतिहासात मानाचे स्थान प्राप्त करुन घेतले आहे. १९६० नंतर दलित-आंबेडकरवादी कवितेच्या पाठोपाठ फार मोठ्या प्रमाणात सर्जनशील दलित-आंबेडकरवादी कथा निर्माण झाली. नवनविन लेखकांच्या कथा डॉ.आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा घेऊन आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आगळ्यावेगळ्या आशय-अभिव्यक्तीने साकार होऊ लागल्या. बाबुराव बागूल, योगीराज वाघमारे, प्र.ई.सोनकांबळे, वामन होवाळ, ताराचंद्र खांडेकर, अरुण कांबळे, पुंडलिक धोंगडे, अमिताभ पद्मपाणी (वामन नगराळे), भिमराव शिरवाडे, सुखराम हिवराळे, व.वा.बोधे, अनंत भोयर, अशोक लोखंडे, अविनाश डोळस, सुधाकर गायकवाड, डॉ.योगेन्द्र मेश्राम, दया पवार, डॉ.प्रकाश खरात, जालंदर सोनुने, अर्जुन डांगळे, केशव मेश्राम, तु.लि.कांबळे, चंद्रकांत वानखेडे, उर्मिला पवार, दयानंद मस्के, जयवंत हिरे, शरणकुमार लिंबाळे, गोरख भालेराव, रमेश पाटील, भीमसेन देठे, मनोहर जिल्हे, जयप्रकाश गवळे, प्रकाश मोगले, गौतमीपुत्र कांबळे इत्यादी अनेक लेखकांची नावे या संदर्भात घेता येतील.

यापैकी काही प्रमुख आबेडकरवादी कथाकारांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

अण्णा भाऊंच्या कथेने पोटाच्या भूकेची आग उभी केली. पण ती स्वाभिमानी व्यक्तींच्या चित्रणातून सरंजामशाही आणि आर्थिक-सामाजिक पिळवणूक यावर ही कथा निर्वाणीचा प्रहार करते. ग्रामीण जीवनाला आलेला शक्तीचा उफाळ हे अण्णा भाऊंच्या कथेचे केंद्र आहे. अण्णा भाऊंच्या जाणीवविश्वाचे पोषण जडवादी विचारवंत मार्क्सने जसे केले तसे जडवाद आणि बंधुता यांची सेंद्रिय मांडणी करणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनीही केले. त्यामुळे त्यांची कथा सर्वच पीडितांच्या दुःखांना शब्द देते, शब्दातून भावनेला वाट मोकळी करुन देते.

**शंकरराव खरात** हेही एक नामवंत कथाकार आहेत. गावगाड्याचे गुंतागुंतीचे चरित्र त्यांची कथा सांगते. गावगाड्यातील नाना माणसे, नाना जमाती, त्यांच्या अंधश्रद्धा आणि पारंपारिक समाजसंस्थेमुळे निर्माण होणारे दुःख खरात चितारतात. खरातांची कथा श्री.म.माट्यांच्या कथेचा पुढचा टप्पा साकार करते. दाहक प्रश्नांनी ती समृद्ध होते. केवढा तरी तपशील ती मांडते. मनोविश्लेषणाशीही ही कथा भिडते. पण घटना व व्यक्ती यांनाच ती प्राधान्य देते असे म्हटले पाहिजे. बारा बलुतेदार, तडिपार, सांगावा, टिटवीचा फेरा असे अनेक कथासंग्रह खरातांच्या नावावर आहेत.

**बाबुराव बागूल** हे आंबेडकरवादी कथेतले सर्वश्रेष्ठ कर्तृत्त्व आहे. "आंबेडकरवादी कथेतला चेकाव्ह" असेच त्यांचे वर्णन करावे लागेल. एकूणच मराठी कथेतही बाबुरावांच्या कथेचे कार्य युगप्रवर्तक आहे. सामाजिक आणि आर्थिक शोषणाच्या वणव्यात जळणाऱ्या दलित-पीडितांच्या जगण्याची कथा बाबुरावांनी अनन्यसाधारण उंचीला नेऊन पोहचवली. जीवनाचे गंभीर चिंतन या कथेला अधिक मौलिकता प्रदान करते. ललित्याने ही कथा मोहरते, फुलून येते. एका बाजूने कवितेशी आणि दुसऱ्या बाजूने निबंधाच्या सीमांशी ही कथा भिडत राहते.

"चौकटीत न मावणारे आक्रमक चित्र" असे शिरीष पै यांनी या कथेचे वर्णन केले आहे ते अत्यंत सार्थ आहे. या कथेत रस्त्यांवरची, झ ोपडयांतली, आणि अशीच बहिष्कृत माणसे आहेत. बाबुराव बागूलांच्या कथेनेही मराठी कथेला नवे नायक दिले. नव्या नायिका दिल्या. हे सर्व नायक-नायिका काळोख फोडताना दिसतात. ही पात्रे वादळी जगणे झेलतात. जगण्याच्या युद्धात उतरलेली ही माणसे आहेत. मराठी कथेतला हा विद्रोहाचा अपूर्व असा उत्कर्ष आहे. मराठी कथेत जी.ए.कुळकर्णी आपल्या जीवनाचे एक स्पष्टीकरण देत होते. दि.पु.चित्रे दुसरे स्पष्टीकरण देत होते त्यावेळी तिसऱ्या आणि क्रांतीशील, परिवर्तनशील आणि आंबेडकरवादी स्पष्टीकरणाचा जाळ या कथेने जमिनीवर पाय रोवून पुढे केला. बाबुराव बागूलांची कथा ही एकूणच मराठी कथेमध्ये एखाद्या चिरसुंदर, ज्वलंत आणि धगधगत्या लेण्यासारखी आहे. नवा आशय, नवी अभिव्यक्ती घेऊन ही कथा मोठ्या दिमाखाने साकारलेली आहे. "जेव्हा मी जात चोरली होती" आणि "मरण स्वस्त होत आहे" या दोन मौलिक कथासंग्रहामधून त्यांची कथा प्रकाशित झालेली आहे.

"मरण स्वस्त होत आहे" हे नाव एकंदर आपली सामाजिक, राजकीय व आर्थिक व्यवस्था अशा प्रकारची आहे हे सिद्ध करणारे आहे. याही कथासंग्रहात मराठी कथेत कधीही न आलेल्या उपेक्षितांची दुनिया अत्यंत कलासंपन्न पद्धतीने बाबुराव बागूलांनी थाटली आहे. बाबुराव बागूलांची कथा बेफाट आहे. ती कथेची रुढ चौकट झुगारुन देते. प्रतिमांच्या भाषेची एक वेगळी, जिवंत आणि प्रत्ययकारी दौलत ती फुलविते. ही कथा अस्वस्थ करते पण रंजक वा प्रचारी होत नाही. बाबुरावांच्या कथेने भोवतीच्या जीवनातील विषमतेचा आकांत आंबेडकरवादाच्या डोळ्यांनी पाहिला. आणि त्यांच्या उग्रदाहक मनाने चितारला. एकूण मराठी कथेला एक अनोखी उंची या कथेने दिली. मराठी साहित्यात काय किंवा भारतीय साहित्यात काय गांधीवाद, मार्क्सवाद, हिन्दुत्ववाद इत्यादी निरनिराळ्या विचारधारा स्वीकारुन कथा साहित्य लेखन झालेले आहे. दलित साहित्याने फुले-आंबेडकरवाद स्वीकारुन मराठी साहित्याला नवा आयाम प्राप्त करुन दिला आहे. त्यामुळे आंबेडकरांनी दिलेली सांस्कृतिक चेतना दलित कथेत प्रकट होते होते. आंबेडकरांनी घडविलेल्या राजकिय-सामाजिक आंदोलनाचे चित्र आविष्कृत होत आहे. सर्वसामान्य माणूस प्रथमच आंबेकरांच्या सोबत आपल्या हक्कासाठी लढा देऊन इतिहास घडवितो आहे. कालपर्यंत न बोलणारा, न चालणारा, न लिहिणारा माणूस आंबेडकरांच्या विचाराने जागृत झाला. त्यामुळे जीवनाचे नवे संदर्भ दलित कथेत तरारुन फुलले आहे. "आंबेडकर संस्कृती"च साहित्यात गोळा होत आहे. डॉ.आंबेडकरांच्या जीवनाला मांडणाऱ्या "आंबेडकर भारत" हा व्यक्तिचित्रणात्मक कथाग्रंथ बाबुराव बागूल यांनी देऊन आंबेडकरांचे कथात्म दर्शन प्रथमच मराठी कथा सृष्टीने अनुभवले आहे. डॉ.आंबेडकर यांच्या व्यक्तीरेखाचे भव्य-दिव्य दर्शन दलित कथा रेखाटते आहे. माणसाला "माणूस" म्हणून प्रतिष्ठित करण्यासाठी त्यांनी वेचलेले कष्ट प्रेरणा होऊन दलित कथेत आविष्कृत होत आहेत. आंबेडकरांनी भोगलेले दु:ख व इतिहासातील अनुभव याचा एक जीवनपट दलित कथेत अश्रुच्या प्रवाहाने बोलका झाला आहे. (होमलॅन्ड) त्यामुळे दलित कथेचा आंबेडकर दर्शन हा एक पैलू ठरावा असेच तिचे काही प्रमाणात स्वरुप आहे.

**सुखराम हिवराळे** यांचा "विश्वगंगेच्या काठी" हा कथासंग्रह १९७९ साली प्रकाशित झाला असला तरी ते १९५६ सालापासूनच सामान्यतः सातत्याने कथालेखन करीत आहेत. हिवराळेंची कथा ग्रामीण जीवनातून आपली सामग्री मिळविते. त्यामुळे त्यांच्या कथेला ग्रामीण ढंग प्राप्त झालेला आहे. धम्म आणि धम्मविरोधी पारंपारिक श्रद्धा यांच्यातील ताण शब्दबद्ध करण्यात ही कथा रमते. हिवराळे यांचे आंबेडकरवादी मन आंबेडकर समाजातील विसंगती नेमकेपणाने टिपताना आणि आविष्कृत करतांना दिसते. पण सुखराम हिवराळे यांच्यातील कथाकाराची प्रतिभा बाबुराव बागूलांच्या प्रतिभेशी नाते सांगण्यापेक्षा ती शंकरराव खरातांच्या संयत, शांत आणि अनाक्रमक प्रतिभेशी जवळीक साधते असे मला वाटते. विनोद, उपरोध आणि कारुण्य यांचीही मदत ही कथा जीवनातील विसंगती मांडतांना येते. वामन होवाळ यांचे "येळकोट" आणि "बेनवाड" हे दोन कथासंग्रह आहेत. होवाळ यांच्या कथेतही प्रामुख्याने ग्रामीण वातावरण येते. या ग्रामीण जीवनातील नाना अंधश्रद्धा, वृत्तीप्रवृत्ती, त्यातील स्वभावाचे इरसाल नमुने, त्यातील दांभिकपणा, बेरकीपणा या गोष्टींवर होवाळ लक्ष केंद्रित करतात. पूजनीय अंधश्रद्धांची अत्यंत सुंदर थट्टा ते करतात.

**योगीराज वाघमारे** यांचे उद्रेक आणि बेगड हे कथासंग्रह. वाघमारे हे आंबेडकरवादी कथेमधले एक महत्त्वाचे कथाकार आहेत. दलित-पिडितांवर होणारे अत्याचार, आंबेडकर-समाजातील लोकांचा सुखवस्तूपणाकडे होणारा प्रवास, प्रदर्शनवादी वृत्ती या गोष्टींवर वाघमारे यांची कथा केंद्रित होते. आंबेडकर समाजातील अपप्रवृत्ती आणि व्यवस्थेने दलितांच्या पदरात बांधलेले दु:ख ही कथा चितारते. असंख्य अंतर्विरोधांवर ही कथा बोट ठेवते.

**अर्जुन डांगळे** यांच्या कथासंग्रहाचे नाव आहे. "बांधावरची माणसे !" या नावातही व्यंग्यार्थ आहे. उपेक्षित समाजातील असंख्य ताणांना डांगळे यांची कथा पेलतांना दिसते. गरिबगुदांवर अत्याचार करणारी, स्त्रियांना शील परवडू न देणारी, जातींची-वर्णांची ही समाजरचना बदलली पाहिजे. जीवनाला बांध नको. कोणी बांधावर असता कामा नये. ही जीवनदृष्टी या कथेतून साकार होतो.

**अमिताभ पद्मपाणी** (वामन नगराळे) यांचा "पड" हा कथासंग्रह अत्यंत महत्त्वाचा आहे. व्यक्तीच्या मनातील दोनतेचे प्रायोगिक पद्धतीने आणि अत्यंत रेखीव पद्धतीने चित्रण करण्यात अमिताभ यांचा हातखंडा आहे. आंबेडकर समाजातील नाना पातळ्यांवरील ताणतणाव, त्यातील संघर्ष आणि आचार-विचारांतील विसंगती यावर ही कथा प्रकाश टाकते.

**अविनाश डोळस** यांच्या कथा संग्रहाचे नाव आहे "महासंगर" ! तरुणांच्या मनातील आजच्या युगाने दिलेली स्वप्ने आणि या स्वप्नांचा चुराडा करणारे प्रत्यक्ष वास्तव असा मोठा भेदक अनुभव डोळस यांच्या कथेतून साकार होतो. "रक्ताळलेली लक्तरे" या योगेंद्र मेश्राम यांचा कथासंग्रह. या संग्रहातून उपेक्षितांच्या व्यथावेदना चित्रित होतांना दिसतात.

**प्रकाश खरात** यांच्या "अंधाराचा अस्त" या कथासंग्रहात दारिद्र्याचे आक्रंदन साकारलेले आहे. त्यांच्या कथेत शेणातील दाणे खाणी माणसे इथे भेटतात. खरातांच्या कथेत वेदनांचा आकांत जसा आहे तसा विद्रोहाचा गडगडाटही आहे. वर्तनामानातील सामाजिक संघर्षाची लेणी खोदणारी ही कथा इतिहासातील घटितांनाही नव्या प्रतीकांच्या रुपात उभी करते. इतिहासातील घटनांचे आजच्या संदर्भात नवे अन्वर्थन सादर करण्याचे लक्षणीय कौशल्य ही कथा प्रकट करते. वैदिक-बौद्ध, नाग आणि वैदिक, क्रांती आणि प्रतिक्रांती यांच्या संघर्षाची मोठी प्रभावी चित्रे खरात साकार करतात. खरातांची कथाप्रतिभा मुख्यत्वे विचारशील आहे. पण ती भावकल्लोळांचेही तेवढेच समर्थ प्रत्यंतर घडविते. त्यांची भाषा ही बाबुरावांप्रमाणे अनेकदा विश्लेषक होते आणि काव्यमयही होते. आपली स्वतंत्र मुद्रा घडविण्यात या कथेला यश आले आहे. दलीतांनी भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय इतिहासात मोठी भूमिका बजावली आहे परंतु त्याचे चित्रण नाही. त्या प्राचीन इतिहासाला पुन्हा नव्याने उभा करण्याचा प्रयत्न दलित कथेने केला आहे.

वेगळ्या धाटणीच्या बौद्ध संस्कृतीदर्शक कथा लिहिणारे आंबेडकरवादी कथालेखक डॉ.प्रकाश खरात यांनी त्यांच्या "अंधाराचा अस्त" या कथासंग्रहातील दंडकारण्य, रक्तपालवी, नागानंद या कथेतून इतिहासातील रक्ताळलेली पाने व मने यांचा भारताच्या सांस्कृतिक संघर्षाच्या सिद्धांताने शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. इतिहासात हरवलेले जीवन लोकवाङ्मय व उत्खननातील शोध साधनांच्या माध्यमातून मांडतांना या काळातील दलित कथा आढळते. दलित कथेने हे एक नवे क्षितिज कवेत घेतलेले आढळते.

**वासुदेव डहाके** यांचा "तांडव" हा कथासंग्रह आहे. या कथासंग्रहातील कथांनी माणुसकीच्या खलनायकांवर कॅमेरा रोखलेला आहे. दलित-शोषितांवरील बहिष्काराचे चित्रण या कथांमधून झालेले आहे. नव्या जीवनाचा स्वीकार करणारे दलित पीडित आणि हे सहन न होणारे सवर्ण यांतील ताणही डहाके यांची कथा प्रभावीपणे मांडते. तांडवमधून गावगाड्यातील चौकटपूजक आणि चौकटभंजक यांच्यातील सांस्कृतिक संघर्षाचे तांडव प्रत्ययकारी पद्धतीने साकार होते. स्त्रीवरील अत्याचारांनीही तांडवमधली कथा एकाचवेळी व्याकुळही झाली आहे आणि संतप्तही झाली आहे.

**जालंदर सोनुने** यांच्या "हिरमोड" (१९९२) आणि "संवेदना" (१९९९) या कथासंग्रहात सुंदर व्यक्तिचित्रपणपर कथा आहेत. किरायाने घर शोधणाऱ्या दलित अधिकाऱ्यालाही जात विचारली जाते. घर मिळत नाही. असे समाजाची अधोगती अधोरेखित करणारे आणि सामाजिक विकृती चव्हाट्यावर मांडणारे अनुभव कथांमधून लेखकाने रोचकपद्धतीने मांडले आहेत. काळ्या पांढऱ्या मानवी प्रवृत्तींचा धांडोळा घेण्यात सोनुनेंची कथा अधिक रमतांना दिसते.

**प्रकाश मोगले** यांचा "कावस" (जाने.१९९९) हा कथासंग्रह आहे. या कथासंग्रहात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्यानंतर "कावस" जन्माला आले. यांनी चळवळीचे जहाज बुडवले. आंबेडकर समाज विकलांग झाला. प्रकाश मोगले यांनी बाबांची चळवळ विकून खाणाऱ्या सर्वच खलपात्रांना इथे धारेवर धरले आहे. "बेगडी विचारवंत सारखी या संग्रहातली कथा वाचली तरी मोगलेंच्या कथा शैलीचे स्वरुप लक्षात येवू शकते. उपरोध हा या कथांचा अंगभूत घटक आहे. "पुन्हा पुन्हा उसापोटी कावस जन्मू नये म्हणून चवदार तळ्यात साचलेला गाळ उपसण्याचा एक प्रयत्न" असे लेखकाने मनोगतामध्ये म्हटले आहे त्याचे प्रत्यंतर कथा वाचताना आल्याशिवाय राहत नाही.

**भीमराव शिरवाळे** हेही उपेक्षित जीवनाचे क्रंदन मांडतांना दिसतात. **संजय लांडगे** आपल्या "मातृभूमी" या कथासंग्रहातून असा बहिष्कृतांच्या दु:खांचा वेध घेतात**. दयानंद म्हस्के, माधव कोंडविलकर, उर्मिला पवार, केशव मेश्राम, के.व्ही.सरवदे, चंद्रकांत वानखडे, किशोर घोरपडे, रमेश पाटील** इत्यादी अनेक लेखकांनी आंबेडकरवादी कथेला गतिमान ठेवले आहे.

याप्रकारे साठोत्तरी मराठी कथेचे क्षितिज दिवसेंदिवस रुंदावत चाललेले दिसून येते. वरील सर्व कथांचा आणि कथाकारांचा सर्वांगीण विचार केल्यास या सर्व आंबेडकरवादी कथाकारांच्या कथेची काही वैशिष्ट्ये जाणवतात ते असे ङ

## आंबेडकरवादी कथेची वैशिष्ट्ये

१) सुधारणावादी, परिवर्तनवादी आशयाला प्राधान्य
२) आंबेडकरवादी कौटुंबिक जीवनदर्शन
३) आंबेडकरवादी तत्त्वज्ञानाचे संवादसौंदर्य
४) अनेक परिवर्तनवादी लढ्यांचे वास्तवदर्शी अविष्कार
५) बौद्ध सांस्कृतिक दर्शन
६) विद्रोह व वेदना यांचे आवेगपूर्ण भावदर्शन
७) नकार, स्वीकार तत्त्वांचे कथात्म चित्रण
८) शरीराच्या भूकेपेक्षा पोटाच्या भूकेला महत्त्व
९) आर्थिक विषमतेची समर्पक मांडणी
१०) सामाजिक जाणीव लोकशाहीवादी आणि आंबेडकरवादी जीवनदृष्टी
११) पात्रे, कथानक व वातावरण यांचे वेगळेपण
१२) वैचारिक, सामाजिक आशयगर्भ तत्वज्ञान

१३) नव्या जाणिवेने प्रितीचित्रण

**भाषाशैली**

१) काव्यात्मशैली
२) भावनात्मकता
३) दु:ख-व्याकुळता
४) अभिव्यक्तीचे शब्दसौष्ठव
५) भाषेची नवीन जीवनगर्भ प्रतिमासृष्टी
६) नवी शब्दकळा ७) वास्तवदर्शी जीवनाशी सुसंगत प्रतिमासृष्टी, इत्यादी

यानंतर अजुनही आंबेडकरवादी कथेला मानवी जीवनाचा विशाल असा पट विणायचा आहे, तिची क्षितिजे रुंदावयाची आहेत. शोषित, पिडितांच्या उरात साठविलेले भव्य-दिव्य नव-नवे अन्वयार्थ भाव जीवनातून उभे करावयाचे आहेत. यादृष्टीने १९६० च्या नंतर ज्या जोमाने आंबेडकरवादी कथा निर्माण झाली त्यापेक्षा अधिक पटीने आंबेडकरवादी कथेचे क्षितिज महाक्षितिज व्हावे अशी आजच्या नव्या कथा लेखकांकडून अपेक्षा करावयास हरकत नाही.

**संदर्भग्रंथ**

१) इंदूमती शेवडे : "मराठी कथा : उगम आणि विकास", सोमैया पब्लिकेशन, मुंबई, १९७३
२) बाळकृष्ण कवठेकर : "दलित साहित्य : एक आकलन", अजब पुस्तकालय, कोल्हापूर, १९८१
३) प्रकाश कुंभार : "दलित कथासाहित्य", प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, प्रकाशन वर्ष उपलब्ध नाही.
४) प्रकाश खरात : "दलित कथा : उगम आणि विकास", सुगावा प्रकाशन पुणे, १९९२
५) यशवंत मनोहर : "आंबेडकरवादी मराठी साहित्य", भीमरत्न प्रकाशन नागपूर, १९९९